**प्रेस नोट** दि. २६/०७/२०२३

# दोन मोक्का केसेस मध्ये पाहिजे असलेला सराईत चेन स्नॅचर आरोपी व त्याचे साथीदारास अटक करुन १० चेन स्नॅचिंग गुन्हे उघडकीस पनवेल शहर पोलीस ठाणेची कारवाई

---

**थोडक्यात हकीगत :-**

तक्रारदार (श्री अजित बळीराम मोकळ) हे दि. ०९/ ०७/२०२३ रोजी त्यांची पत्नी, आई व दोन लहान मुलांसह रिक्षा मधुन प्रवास करीत असताना रिक्षाचे पाठीमागुन येणारी काळ्या रंगाचे मोटार सायकल वरील दोन अनोळखी इसमांपैकी पाठीमागे बसलेल्या इसमाने तक्रारदार यांच्या पत्नीच्या गळ्यातील सोडतीन तोळे वजनाचे सोन्याचे गंठन पेंडलसह जबरीने हिसका मारुन चोरुन नेले बाबत दि. ०९/०७/२०२३ रोजी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. ४०८/२०२३ भा.द.वि. स कायदा कलम ३९२, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

मा.पोलीस आयुक्त श्री. मिलिंद भारंबे, मा.पोलीस सह आयुक्त श्री.संजय मोहिते, मा.पोलीस उप आयुक्त श्री.पंकज डहाणे व मा.श्री.अशोक राजपुत, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग यांनी गुन्हयातील आरोपींचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

**गुन्हयाची उकल :-**

मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांनुसार पनवेल पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री नितीन ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळाचे परिसरातील सी.सी.टी.व्ही. कॅमेराची पडताळणी करुन व पोउपनि/अभयसिंह शिंदे हे एम.पी. ए. नाशिक येथे प्रशिक्षणाकरिता असताना देखील त्यांना मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे आरोपीची माहिती प्राप्त केली. प्राप्त माहितीच्या आधारे पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सपोनि/स्वप्निल केदार, पोउपनि/किरण वाघ, पोउपनि/नरेंद्र जगदाळे व १२ पोलीस अंमलदार यांनी मा. वरिष्ठांच्या परवानगीने अतिसंवेदनशील अशा आंबिवली, कल्याण येथील खडकपाडा स्थानिक पोलीसांच्या मदतीने कोंबींग ऑपरेशन करुन गुन्हयातील आरोपी तन्वीर फैरोज हुसेन उर्फ इराणी उर्फ जाफरी, वय २३ वर्षे, रा. पाटील नगर, गल्ली नं. ०४, अंबिवली, कल्याण, जि. ठाणे यास ताब्यात घेतले. सदर आरोपीकडे केलेल्या तपासात त्याने त्याचा सहकारी आरोपी अली जावेद इराणी याचेसह अनेक चेन स्नॅचींगचे गुन्हे केल्याचे सांगीतले. तसे मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ आरोपी अली जावेद इराणी याचा शोध घेणेकामी स्थापन केलेल्या पनवेल शहर पोलीस ठाणे, पनवेल तालुका व कळंबोली, तळोजा या पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांनी अंबिवली येथे कोंबींग ऑपरेशन करुन आरोपी अली जावेद इराणी, वय २३ वर्षे, रा. पाटील नगर, गल्ली नं. ०४, आंबिवली, कल्याण, जि. ठाणे यास शिताफीने ताब्यात घेतले आहे. दोन्ही आरोपींकडे तपास केला असता आरोपी यांचेककडुन खालील गुन्हे उघडकीस आले आहेत. तसेच इतर ०६ गुन्हे केल्याची कबुली दिली असून त्याबाबत आरोपींताचा ताबा घेवुन पुढील कारवाई केली जात आहे.

**अटक आरोपी :-**

१) तन्वीर फैरोज हुसेन उर्फ इराणी उर्फ जाफरी, वय २३ वर्षे, रा. पाटील नगर, गल्ली नं. ०४, अंबिवली, कल्याण,

२) अली जावेद इराणी, वय २३ वर्षे, रा. पाटील नगर, गल्ली नं. ०४, आंबिवली, कल्याण

**आरोपी यांचेकडुन अदयापपर्यंत उघडकीस आलेले गुन्हे :-**

१) पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ४०८/२०२३ भादवि कलम ३९२, ३४.

२) पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ५७/२०२३ भादवि कलम ३९२, ३४.

३) तळोजा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. २३२/२०२३ भादवि कलम ३९२, ३४.

४) पनवेल तालुका पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १७५/२०२३ भादवि कलम ३९२, ३४.

**सदर आरोपी विरोधात मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कर्नाटक, गुजरात, इत्यादी ठिकाणी अनेक चेन स्नॅचींग, बतावणी अशा प्रकारचे गुन्हे दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.**

**५) हस्तगत मालमत्ता :-**

| | | |
|---|---|---|
| **१** | १,४०,०००/- | रु किं.ची ३५ ग्राम वजनाची एक सोन्याची गंठण त्यामध्ये काळे मणी असलेली व त्रिकोणी पान असलेले पेंडंट जु.वा.कि.सु. ( **पनवेल शहर पो.ठाणे गु.र.नं. ४०८/२०२३** ) |
| **२** | ३६,०००/- | रु किं. चे ०९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र त्यात काळे मणी व त्यास सोन्याचे मणी व पॅडल असलेले जु.वा.कि.सु. ( **तळोजा पो.ठाणे गु.र.नं. २३२/२०२३** ) |
| **३** | ३२,०००/- | रु किं.ची ०८ ग्राम वजनाचे एक सोन्याचे एक सोन्याचे मंगळसुत्र त्यास काळे मणी व सोन्याची मणी व एक पेंडल असलेले ( **पनवेल तालुका पो.ठाणे गु.र. नं. १७५/२०२३** ) |
| | २,०८,०००/- | रु. किं.चे एकुण ५२ ग्राम वजनाचे सोन्याचे दागिने. |

**६) आरोपीवरील दाखल MCOC कारवाई :-**

आरोपी तन्वीर फैरोज हुसेन उर्फ इराणी उर्फ जाफरी हा गुन्हयात पाहीजे असलेला आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

१) अंबरनाथ पोलीस ठाणे, ठाणे शहर गुन्हा रजि. नं. ४३४/२०२२ भादवि कलम ३९४, ७५, ३४ सह महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा चे कलम ३(१)(II), ३(२), ३(४)

२) बदलापुर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १५६/२०२२ भादवि कलम ३९२, ५०४, ७५, ३४ सह महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा चे कलम ३(१)(II), ३(२), ३(४)

**<u>कारवाई पथक</u> :-**

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सपोनि/सुषमा पाटील, सपोनि/प्रकाश पवार, सपोनि/स्वप्निल केदार, पोउपनि/किरण वाघ, पोउपनि/नरेंद्र जगदाळे, पोउपनि/सुनिल गिरी तसेच पनवेल तालुका पोलीस ठाणेचे सपोनि/अविनाश पाळदे, पोउपनि/हर्षल राजपुत, कळंबोली पोलीस ठाणेचे सपोनि/राजेंद्र जाधव व तळोजा पोलीस ठाणेचे सपोनि/नितीन शिरसाठ, खांदेशवर पोलीस ठाणेचे सपोनि/पानसरे व पुरुष/महिला पोलीस अंमलदार यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा तपास मा.पोलीस उप आयुक्त, परि-२ पनवेल व मा.सहा.पोलीस आयुक्त, पनवेल विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि/ प्रकाश पवार हे करीत आहेत.

---